# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

**वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर, ४४० ००१**

**परिपत्रक** क्र. कक्ष-१०(१)/आस्था/एक/प्र.क्र.१५०( २०-२१)/ १५२०
नागपूर ४४०००१, दिनांक ३०/०३/२०२१

**विषय :** कामाचे ठिकाणी महिलांना होणा-या त्रासाचे निवारण करणेबाबत

**प्रस्तावना** :-

महाराष्ट्र राज्य हे एक पुरोगामी राज्य आहे. या राज्यात महिलांना शासकीय नोकरीमध्ये ३०% आरक्षण असून सर्वच क्षेत्रात त्यांचा वावर दिसून येतो. वनविभाग हा एक विशेष विभाग असून यात वने व वन्यजीव संवर्धन व संरक्षण विषयक कामे केली जातात. क्षेत्रीय स्तरावर तसेच कार्यालयात महिलांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असून कामकाजात महिलांचा मोठा वाटा आहे. क्षेत्रीय कामे करताना कामाचे ठिकाण हे ब-याचदा लोकवस्तीपासून दुर असते. तथापी इतर विभागाप्रमाणे वनविभागातही काही ठिकाणी महिलांना विविध प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, असे विविध संघटनामार्फत निदर्शनास आणून देण्यात आले आहे. यामध्ये लैंगिक छळाच्या घटना, अश्लील मॅसेज करणे, कामात पिळवणूक होणे, अपमानास्पद वागणूक मिळणे, अपशब्द वापरले जाणे, तुच्छतेची वागणूक मिळणे, कमी लेखणे, रात्री-अपरात्री एकट्यात बोलविणे, यासारख्या घटना कामाचे ठिकाणी घडत असल्याबाबतचा उल्लेख करण्यात आला आहे. नुकतीच कु. दिपाली जनार्धन चव्हाण,वन परिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) हरिसाल, गुगामल वन्यजीव विभाग यांचे आत्महत्येची दुदैवी घटना घडली. त्यांनी आत्महत्येपूर्वी लिहून ठेवलेल्या पत्रावरुन त्यांना वरिष्ठांकडून मानसिक त्रास होत असल्यामुळे त्या आत्महत्या करीत असल्याचे पत्रात नमुद केले आहे. अशा घटना भविष्यात पुन्हा घडू नये, याकरीता महिला अधिकारी / कर्मचा-यांना होत असलेल्या त्रासाबाबत उपापयोजना करणे आवश्यक आहे. लैंगिक छळाचे तक्रारीचे निवारण करण्यासाठी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ मध्ये तरतूद केली आहे. तथापी सदर कायद्यातील तरतूदी या फक्त लैंगिक छळापूरत्या मर्यादित आहे. त्यासोबतच महिलांच्या शासकीय कामाविषयी इतरही तक्रारींबाबत तात्काळ उपायोजना करण्याचे दृष्टीने कार्यवाही होणे आवश्यक असल्याने पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

**परिपत्रक** :-

**१.० लैंगिक छळाच्या तक्रारीसाठी "अंतर्गत तक्रार समिती"** (Internal Complaints Committee):-

१.१ केंद्र शासनाने कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ पारीत केला आहे. तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, निर्णय क्र. मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक, दिनांक १९/६/२०१४ अन्वये, ज्या आस्थापनेमध्ये १० किंवा त्यापेक्षा अधिक अधिकारी / कर्मचारी यांचा समावेश असेल अशा प्रत्येक नियोक्त्याने आपल्या आस्थापनेमध्ये खालीलप्रमाणे **"अंतर्गत तक्रार समिती"** गठीत करणेबाबत निर्देश दिले आहेत.

*"(अ) कार्यालयातील वरिष्ठ महिला अधिकारी, यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करावी.*

*परंतु, वरिष्ठ महिला अधिकारी / कर्मचारी उपलब्ध नसेल तर इतर कार्यालये, प्रशासकीय विभाग जी विविध ठिकाणी म्हणजे विभाग किंवा उपविभाग*

*स्तरावर कार्यरत आहेत अशा कार्यालयातील उच्च पदस्थ महिला अधिकारी यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करता येईल.*

*तसेच कामाच्या ठिकाणी असणा-या इतर कार्यालयात किंवा प्रशासकीय विभागात सुध्दा वरिष्ठ महिला अधिकारी / कर्मचारी उपलब्ध होत नसेल तर त्याच नियोक्त्याच्या अन्य कोणत्याही कामाच्या ठिकाणाहून किंवा इतर विभागातून किंवा खाजगी क्षेत्रात इतर संघटनेतील अध्यक्ष पदस्थ महिला अधिका-याची नियुक्त करता येईल.*

*(ब) सदर समितीमध्ये, प्राधान्याने महिलांच्या सोयीसाठी बांधिल असलेल्या किंवा ज्यांना सामाजिक कार्याचा अनुभव आहे किंवा ज्यांना कायद्याचे ज्ञान आहे अशा कर्मचा-यांमधून किमान दोन सदस्य नियुक्त करावेत.*

*(क) महिलांच्या प्रश्नांशी बांधील असलेल्या अशासकीय संघटना किंवा संघ किंवा लैंगिक छळाशी संबंधित प्रश्नांशी परिचित असलेली व्यक्ती, यामधील एक सदस्य असावा.*

*परंतु, अशा रितीने नामनिर्देशित करावयाच्या एकूण सदस्यांपैकी किमान ५०% सदस्य महिला असाव्यात.*

*अंतर्गत तक्रार समितीचे अध्यक्ष आणि प्रत्येक सदस्य यांची कार्यालय प्रमुखाकडून नियुक्ती करण्यात येईल व त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून ३ वर्षाहून अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी ते सदर पद धारण करतील."*

१.२ वनविभागात प्रत्येक कार्यालयात वरीलप्रमाणे **"अंतर्गत तक्रार समिती"** गठीत करण्यात आल्या असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. याबाबत प्राप्त तक्रारींचा मासिक अहवाल उपवनसंरक्षक यांनी विहीत प्रपत्रात मुख्य वनसंरक्षक यांचेकडे व मुख्य वनसंरक्षक यांनी संकिलत अहवाल विहीत प्रपत्रात या कार्यालयास सादर करावा. तसेच प्रत्येक उपवनसंरक्षक यांनी त्यांचे अधिनस्त परिक्षेत्र कार्यालयात, मुख्य वनसंरक्षक यांनी त्यांचे अधिनस्त वनविभाग कार्यालयात अशा **"अंतर्गत तक्रार समिती"** चे कामकाजाचा दर महिन्याला आढावा घ्यावा.

१.३ सदर **"अंतर्गत तक्रार समिती"** च्या नियमित बैठका दर महिन्याचे दुस-या शुक्रवारी तसेच तक्रार प्राप्त झाल्यानंतर तात्काळ घ्याव्यात. तसेच त्यांचेकडे प्राप्त तक्रारींचे निवारण करावे.

१.४ वरीलप्रमाणे **"अंतर्गत तक्रार समिती"** चा राज्यस्तीय आढावा घेण्यासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) हे नोडल अधिकारी राहतील.

२.० कामकाजाशी निगडीत **"तक्रार निवारण समिती"** (**"Grievance Redressal Committee"**):- :-

२.१ वनविभागातील खालील संवर्गातील अधिकारी **महिला कर्मचा-यांना** त्यांचे वरीष्ठांकडून / सहका-यांकडून पिळवणूक होणे, अपमानास्पद वागणूक मिळणे (प्रस्तावनेत उल्लेखित अशाप्रकारचा छळ जो लैंगिक छळात मोडत नाही) अशा कामाशी निगडीत काही तक्रारी

असल्यास त्यांनी त्यांचे तक्रारीबाबत लेखी स्वरुपात कामकाजाशी निगडीत **"तक्रार निवारण समिती" कडे** (**Grievance Redressal Committee**) अर्ज करावा.

| अ.क्र. | ज्या अधिकारी / कर्मचा-याविरुध्द तक्रार आहे त्याचे पदनाम | तक्रार निवारण समिती | समितीचा रचना |
|---|---|---|---|
| १ | वनरक्षक / वनपाल | विभाग स्तरावरील समिती | अध्यक्ष व इतर सदस्य हे **"अंतर्गत तक्रार समिती"** तील घेण्यात यावे. |
| २ | परिक्षेत्र स्तरावरील लिपीक / लेखापाल | विभाग स्तरावरील समिती | अध्यक्ष व इतर सदस्य हे **"अंतर्गत तक्रार समिती"** तील घेण्यात यावे. |
| ३ | वन परिक्षेत्र अधिकारी / सहाय्यक वनसंरक्षक | वनवृत्त स्तरावरील समिती | अध्यक्ष व इतर सदस्य हे **"अंतर्गत तक्रार समिती"** तील घेण्यात यावे. |
| ४ | विभाग स्तरावरील लिपीक / लेखापाल / मुख्य लेखापाल / कार्यालय अधिक्षक | वनवृत्त स्तरावरील समिती | अध्यक्ष व इतर सदस्य हे **"अंतर्गत तक्रार समिती"** तील घेण्यात यावे. |
| ५ | विभागीय वन अधिकारी / उपवनसंरक्षक / प्रशासकीय अधिकारी व इतर वरिष्ठ अधिकारी | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) यांचे कार्यालयाचे स्तरावरील समिती | अध्यक्ष व इतर सदस्य हे **"अंतर्गत तक्रार समिती"** तील घेण्यात यावे. |

२.२ वरीलप्रमाणे समिती गठीत करण्याबाबत मुख्य वनसंरक्षक हे आदेश निर्गमित करतील.

२.३ सदर "तक्रार निवारण समिती" च्या कार्यकक्षा पुढील प्रमाणे राहील.

(अ) सदर समितीने दर महिन्याला दुस-या शुक्रवारी बैठक घेऊन समितीकडे प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने चौकशी करावी.

(ब) तक्रारकर्ती तसेच ज्यांचेविरुध्द तक्रार केली आहे त्यांची बाजू ऐकूण घेऊन समुपदेशनाद्वारे (Counselling) मनोबल वाढविण्याचे प्रयत्न करावेत.

(क) समितीच्या कामकाजाचे सर्व बाबी / दस्ताऐवज गोपनीय ठेवण्याची जबाबदारी तक्रारकर्ती व समितीची राहील.

(ड) तक्रारकर्ती समितीच्या सदस्यांना केव्हाही स्वतः किंवा दूरध्वनीवर संपर्क करु शकेल व समितीच्या सदस्यांनी त्याची दखल घेणे जरुरीचे राहील.

(इ) समितीने त्यांचेकडे प्राप्त तक्रारीवर ९० दिवसात शिफारशीसह अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

(फ) समिती शिफारशीचे अनुपालन १ महिन्याचे आत करण्याचे संबंधितास बंधनकारक राहील.

२.४ अन्यायग्रस्त अधिकारी / कर्मचा-यानी ज्या समितीकडे अर्ज केला आहे त्या समितीकडून त्यास न्याय न मिळाल्यास, त्यापेक्षा वरीष्ठ कार्यालयातील समितीकडे अपील अर्ज करण्याची मुभा राहील.

२.४ "तक्रार निवारण समिती" कडे प्राप्त तक्रारींचा मासिक अहवाल उपवनसंरक्षक यांनी विहीत प्रपत्रात मुख्य वनसंरक्षक यांचेकडे व मुख्य वनसंरक्षक यांनी संकिलत अहवाल विहीत प्रपत्रात या कार्यालयास सादर करावा. तसेच प्रत्येक मुख्य वनसंरक्षक यांनी त्यांचे कार्यालयात व अधिनस्त वनविभाग कार्यालयात अशा "तक्रार निवारण समिती" चे कामकाजाचा दर महिन्याला आढावा घ्यावा.

२.५ वरीलप्रमाणे कामकाजाशी निगडीत तक्रार निवारण समित्या (**Grievance Redressal Committee**) गठीत करण्यात आल्या आहेत किंवा नाही, तसेच त्यांच्या नियमित बैठका होत आहेत किंवा नाही, याबाबत राज्यस्तरीय संनियंत्रण ठेवण्यासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) हे नोडल अधिकारी राहतील.

**टिप** :- लैंगिक छळाच्या तक्रारीसाठी **"अंतर्गत तक्रार समिती"** व कामकाजाशी निगडीत "**तक्रार निवारण समिती"** यांच्या बैठक एकाच दिवशी घ्याव्यात व त्याची इतिवृत्त स्वतंत्रपणे नोंदविण्यात यावे.

## ३.० वाद निवारण करणे व समुपदेशन (Conflict Resolution & Counselling):-

३.१ कार्यालयीन कामकाज करत असताना कनिष्ठ आणि वरीष्ठ किंवा सहकारी आपआपसात कामाचा पुर्ततेसाठी हेतूपुरस्सर अथवा नकळत विसंवाद निर्माण होतो. सदर प्रकार ब-याचदा स्थानिक स्तरावर त्रयस्थ पक्षाकडून संवाद / समुपदेशन याद्वारे सोडवला जाऊ शकतो. तसेच अन्यायग्रस्त व अन्याय करणा-या व्यक्तीस नियमांची पुरेशी माहिती नसते. अशावेळी दोघांची बाजू ऐकूण घेऊन मार्गदर्शक (Mentor) यांचेद्वारे दोन्ही पक्षांना मानसिक व भावनिक आधार देऊन व नियमांची जाणीव करुन दिल्यास वाद निवारण करता येऊ शकतो. यामध्ये मार्गदर्शक (Mentor) हे महत्वाची भूमिका निभावू शकतात.

३.२ अधिकारी / कर्मचारी ज्या अधिका-याचे अधिनस्त काम करतो त्याच कार्यालयातील अधिका-याकडे मनमोकळेपणाने आपली अडचण सांगू शकणार नाही. ही बाब विचारात घेऊन खालील संवर्गातील **महिला अधिकारी / कर्मचा-यांकरीता** खालीलप्रमाणे मार्गदर्शक (Mentor) नेमण्यात येत आहे.

| अ. क्र | संवर्ग | मार्गदर्शकाचे (Mentor) पदनाम | मार्गदर्शकाकडून अडचणीचे निवारण न झाल्यास संपर्क करावयाचे वरीष्ठ अधिकारी | मार्गदर्शकाची (Mentor) नेमणूक करणारे अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | परिक्षेत्र स्तरावरील वनरक्षक / वनपाल / लिपीक / लेखापाल | विभाग स्तरावरील सहाय्यक वनसंरक्षक | उपवनसंरक्षक | मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (प्रा.) |
| २ | वन परिक्षेत्र अधिकारी / सहाय्यक वनसंरक्षक / विभाग स्तरावरील लिपीक / लेखापाल / मुख्य लेखापाल / कार्यालय अधिक्षक | वनवृत्त स्तरावरील विभागीय वन अधिकारी | मुख्य वनसंरक्षक | मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (प्रा.) |
| ३ | विभागीय वन अधिकारी / उपवनसंरक्षक तसेच वृत्तस्तरावरील स्तरावरील लिपीक / लेखापाल / मुख्य लेखापाल / प्रशासकीय अधिकारी | पालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक / प्रधान मुख्य वनसंरक्षक | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) | -- |

३.३ मार्गदर्शकाकडे एखादा अधिकारी / कर्मचारी एखादे वाद-विवादाचे प्रकरण घेऊन आल्यास त्याची बाजू ऐकूण / तपासून घेऊन त्याचे समुपदेशनाद्वारे त्यांना नियमांची जाणीव करुन द्यावी व मनोबल वाढविण्याचे प्रयत्न करावेत. त्याच्या प्रकरणात तथ्य आढळून आल्यास अन्याय करणा-या अधिकारी / कर्मचा-याची बाजू ऐकूण घ्यावी व याबाबत समज द्यावी. तसेच त्यांचे वरीष्ठांना अहवाल सादर करावा. यामुळे प्रकरण संवेदनशिल होण्यापूर्वीच असे प्रकरणे परस्पर सहमतीने निकाली काढता येऊ शकेल.

३.४ वरीलप्रमाणे मार्गदर्शक (Mentor) नेमण्यात आले आहेत किंवा नाही, याबाबत प्रत्येक मुख्य वनसंरक्षक यांनी त्यांचे अधिनस्त वनविभाग स्तरावरील कार्यालयांचा आढावा घ्यावा. याबाबत राज्य स्तरीय संनियंत्रण ठेवण्यासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) हे नोडल अधिकारी राहतील.

**४.० मानव संसाधन विकासासाठी प्रशिक्षण आयोजित करणे** (Human Resources Development Training):-

४.१ वनविभागातील अधिकारी / कर्मचारी यांचे यांना क्षेत्रीय काम करताना येत असणा-या विविध अडचणी, त्यामुळे येणारा ताण यामुळे त्यांचे काम करण्याचे क्षमतेवर विपरित

परिणाम होतो. त्याकरीता त्यांचे मनोबल उंचावणे, अंगभूत कौशल्याला चालणा देणे, पुरुष व महिला कर्मचा-यांना एकत्र काम करण्याबाबत विश्वासार्ह वातावरण तयार करणे, याकरीता वेळोवेळी प्रशिक्षण आयोजित करणे आवश्यक आहे.

४.२ करीता आंतरवैयक्तिक संबंध, व्यक्तिमत्व विकास, ताण-तणाव व्यवस्थापन, संघ व्यवस्थापन, नेतृत्व कौशल्य विकास, निरोगी शरीर व ध्यान साधना, कामाचे व वेळेचे व्यवस्थान इत्यादी विषयावर अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन शिक्षण व प्रशिक्षण), पुणे / संबंधित मुख्य वनसंरक्षक / उपवनसंरक्षक / उपसंचालक / विभागीय वन अधिकारी यांनी प्रशिक्षण आयोजित करावे.

४.३ अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन शिक्षण व प्रशिक्षण), पुणे यांनी या विषयावर तज्ञ वक्ता यांची राज्य / वृत्तस्तरावर निवड करावी व त्याची यादी क्षेत्रीय स्तरावर उपलब्ध करुन द्यावी.

४.४ वरीलप्रमाणे प्रशिक्षण आयोजित होत आहेत किंवा नाही, याबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन शिक्षण व प्रशिक्षण), पुणे हे नोडल अधिकारी राहतील.

## ५.०. **गर्भवती महिलांचे बाबत अडी-अडचणींबाबत** (Maternity issues):-

५.१ साधारणतः महिलांचे बाबतीत युवा वयात नोकरीमध्ये भरती होणे तसेच वैवाहीक आयुष्याची सुरवात होणे या गोष्टी एकाचवेळी येतात. अशा वेळेस विभागातील कर्तव्ये व वैवाहीक जबाबदा-या यांचे संतुलन राखण्याची कसरत महिलांना करावी लागते. या दरम्यान शारीरिक व मानसिक ताणातून त्या जातात. नजिकच्या काळात क्षेत्रीय स्तरावर काम करणा-या महिला अधिकारी / कर्मचा-यांच्या गर्भपाताच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

५.२ अशा घटना टाळण्यासाठी सुचना देण्यात येत आहेत कि, गर्भवती महिलांच्या अडी-अडचणींचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा.

५.३ गर्भवती महिलांना या काळात वैद्यकीय कारणास्तव रजेची मागणी केल्यास त्यांना प्रचलित नियमाप्रमाणे यथाशिघ्र अनुज्ञेय रजा मंजूर करण्यात याव्यात.

५.४ वैद्यकीय प्रमाणपत्राचे आधारे गर्भवती महिलांना प्रचलित नियमाप्रमाणे प्रसूती रजा (१८० दिवसांपर्यंत) मंजूर करण्यात यावी. तसेच त्यांनी मागणी केल्यानुसार अनुज्ञेय बाल संगोपन रजा मंजूर करण्यात यावी.

## ६.० **जनजागृती व प्रसिध्दी** (Awareness & Publicity):-

६.१ वनविभागातील लैंगिक छळाच्या तक्रारीसाठी **"अंतर्गत तक्रार समिती"** यांची रचना व संबंधित अधिका-यांचे नाव प्रत्येक कार्यालयात दर्शनी भागावर लावण्यात यावे. तसेच याबाबत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यात यावी.

६.२ तसेच कामकाजाशी निगडीत **"तक्रार निवारण समिती"** (Grievance Redressal Committee) रचना व संबंधित अधिका-यांचे नाव प्रत्येक कार्यालयात दर्शनी भागावर लावण्यात यावे. तसेच याबाबत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यात यावी.

६.३ याबाबत माहितीपत्रक प्रसिध्द करुन तळागळातील अधिकारी / कर्मचा-यांना याबाबत जाणीव होईल याद्दष्टीने जनजागृती व प्रसिध्दी करावी. सदर कामी प्रसिध्दी व माहिती अधिकारी, नागपूर हे क्षेत्रीस स्तरावर आवश्यक ते सहकार्य करतील.

६.४ वरीलप्रमाणे कार्यवाही होत आहे किंवा नाही, यासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) हे नोडल अधिकारी राहतील.

(जी. साईप्रकाश)
प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन बल प्रमुख)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व नागपूर / पश्चिम मुंबई
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, व्याघ्र प्रकल्प मेळघाट, अमरावती
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन शिक्षण व प्रशिक्षण), पुणे
६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
७) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (सर्व)
८) मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), पुणे
९) वनसंरक्षक (प्रादेशिक) धुळे / गडचिरोली
१०) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर
११) वनसंरक्षक, कार्य आयोजना, पुणे / नागपूर
१२) वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, व्याघ्र प्रकल्प सर्व
१३) वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण सर्व
१४) वनसंरक्षक (संशोधन), पुणे
१५) उपवनसंरक्षक , सर्व
१६) विभागीय वन अधिकारी सर्व

प्रतिलिपी (ई-मेलद्वारे):-

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
२) अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३) प्रधान सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४) प्रधान सचिव (वने), महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर
६) सदस्य सचिव तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर
७) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
८) प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
९) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ठ वनोपज), महाराष्ट्र राज्य, नागपूर
११) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर

१४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर